सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १२९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. १३ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून विमान दुर्घटना स्थळाची पाहणी

### जखमीच्या प्रकृतीची केली विचारपूस, स्थानिक अधिकाऱ्यांना दिले निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अहमदाबाद**

गुरुवारी अहमदाबाद येथे झालेल्या एअर इंडियाच्या बोईंग ७८७विमानाच्या भीषण अपघाताने संपूर्ण देश हादरला आहे. या दुर्घटनेत २२९ प्रवासी आणि १२ क्रू मेंबर्ससह एकूण २६५ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचाही समावेश आहे. या अपघाताने संपूर्ण देश सुन्न झाला आहे. दरम्यान, या अपघातानंतर आज सकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदीही अहमदाबादमध्ये पोहोचले असून त्यांनी आज घटना स्थळाची पाहणी केली.



पंतप्रधान मोदींचा ताफा प्रथम घटनास्थळी पोहोचला. जिथे पंतप्रधान मोदींनी परिस्थितीचा आढावा घेतला. घटनास्थळी पोहोचल्यानंतर मोदींनी अपघाताबद्दल सर्व माहिती गोळा केली. दुर्घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर, पंतप्रधान मोदी जखमींना भेटण्यासाठी रुग्णालयात रवाना झाले. यावेळी गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल देखील पंतप्रधानांसोबत उपस्थित होते.पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी १०:०० वाजता अहमदाबादमध्ये दाखल झाले, त्यानंतर त्यांनी घटनास्थळाची पाहणी केली. यावेळी त्यांनी स्थानिक प्रशासन, पोलीस आणि राष्ट्रीय आपत्ती निवारण दल (एनडीआरएफ) यांच्याशी चर्चा करून बचाव कार्याची माहिती घेतली. त्यानंतर ते सिव्हिल हॉस्पिटलमध्ये पोहचले. यावेळी त्यांनी जखमींना भेटून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली तसेच त्यांना वैद्यकीय सुविधा तातडीने पुरवण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.विमान अपघात तपास ब्युरो (--खइ) आणि बोईंगच्या तज्ज्ञांनी अपघाताच्या कारणांचा तपास सुरू केला असून विमानाचा एक ब्लॅक बॉक्स सापडला आहे. ब्लॅक बॉक्सच्या विश्लेषणातून अपघाताची कारणे सजणार आहेत. महत्त्वाचे म्हणजे टाटा समूहाने प्रत्येक मृताच्या कुटुंबीयांना १ कोटी रुपये आर्थिक मदत जाहीर केली आहे. मृतांची ओळख पटवण्यासाठी डीएनए चाचण्या सुरू आहेत.

## अहमदाबाद विमान अपघाताचे कारण समोर येणार

### अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स लागला हाती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अहमदाबाद**

अहमदाबादातील मेघानीनगर परिसरात १२ जून गुरूवारी १.३० च्या सुमारास एअर इंडियाचं विमान कोसळल्याने एकच खळबळ उडाली. या विमानात २३० प्रवाशी होते. तर १२ क्रू मेंबर्स देखील उपस्थित होते. माहितीनुसार या विमान अपघातामध्ये विमानातील २४१ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. मात्र विमान अपघाताचे कारण काय? याबाबत कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. घटनास्थळी बचावकार्य सुरु आहे. घटनास्थळी लष्कराचे १३० जवान बचावकार्य करत आहे. तसेच आता अखेर या अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स बचाव पथकाच्या हाती लागला आहे. ब्लॅक बॉक्समुळे विमानाचे खरे कारण समोर येणार आहे.

आज शुक्रवारी १३ जून रोजी गुजरातच्या दहशतवाद विरोधी पथकाने या राखेच्या ढिगाऱ्या



खालून एक डिजिटल व्हिडीओ रेकॉर्डर मिळवला आहे. तसेच या अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स बचाव पथकाच्या हाती लागला आहे. हे दोन्ही डिव्हाईस अपघाताचं कारण शोधण्यास महत्त्वाचे असतात. तर यावर बोलताना एटीएस अधिकाऱ्याने सांगितले की, हा डिजिटल व्हिडीओ रेकॉर्डर आहे. हा ढीगाऱ्या खाली मिळाला. फॉरेन्सिक सायन्सच्या मदतीने याची तपासणी केली जाईल. ज्यातून या दुर्घटनेचे धागेदोरे मिळतील.

## अपघातानंतर मला शुद्ध आली तेव्हा, विमान अपघातातून वाचलेल्या विश्वास रमेश यांनी सांगितलं नेमकं काय घडलं

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अहमदाबाद**

विमानानं टेकऑफ घेतल्यानंतर साधारण पुढच्या ३० सेकंदांमध्येच खूप मोठा आवाज यायला लागला आणि विमान कोसळलं. या सगळ्या घडामोडी खूपच वेगाने घडल्या अहमदाबाद येथे झालेल्या भीषण विमान अपघातामधून चमत्कारिकरीत्या बचावलेले एकमेव प्रवासी विश्वास कुमार रमेश सांगत होते. रुग्णालयाच्या बेडवर पडल्या पडल्या त्याच विमानातून प्रवास करणाऱ्या आपल्या भावाला शोधण्यासाठी ते गयावया करत होते. त्याला शोधून काढण्याची आर्जवं करत होते.

३९ वर्षीय विश्वास रमेश हे भारतीय वंशाचे ब्रिटिश नागरिक असून दीव येथे आपल्या भावासोबत आले होते. त्यांची पत्नी व मुलं लंडनमध्ये राहतात. अहमदाबादहून ते आपल्या भावासोबत परत निघाले होते. एअर इंडियाच्या AI 171 या




विमानात 11A या सीटवर ते बसले होते. त्यांच्यासह विमानात एकूण २४२ प्रवासी होते. मेघानीनगर परिसरात विमान कोसळल्यानंतर त्यांच्यापैकी २४१ प्रवासी आणि विमानातील सर्व क्रू मेंबर्स यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या भीषण अपघातातून फक्त विश्वास रमेश बचावले.

**काय पाहिलं विश्वास रमेश यांनी?**

दरम्यान, रुग्णालयात उपचार घेत असलेल्या विश्वास रमेश यांनी हिंदुस्तान टाईम्सला दिलेल्या प्रतिक्रियेमध्ये नेमकं काय घडलं याची माहिती दिली आहे. विमानानं टेकऑफ घेतल्यानंतर पुढच्या ३० सेकंदांमध्येच मोठे आवाज यायला लागले आणि त्यानंतर अवघ्या काही क्षणांत विमान कोसळलं. मला शुद्ध आली तेव्हा माझ्या आसपास सगळीकडे लोकांचे मृतदेह होते. मी प्रचंड घाबरलो होतो. मी उठून उभा राहिलो आणि धावायला लागलो. तिकडे सगळीकडे विमानाचे जळते तुकडे पसरलेले होते. कुणीतरी मला पकडलं आणि रुग्णवाहिकेत नेलं आणि तिथून रुग्णालयात आणलं, असं विश्वास रमेश यांनी सांगितलं.

## अहमदाबाद विमान अपघातपूर्वी वैमानिकाने दिला होता तीनदा 'मे डे' संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३नागपूर**

एअर इंडियाच्या विमानाला अहमदाबाद विमानतळांजवळ भीषण अपघात झाला आणि त्यात प्रवाशांसह २६५ जणांचा मृत्यू झाला. विमान कोसळन्यापूर्वी मुख्य वैमानिकाने तीनदा 'मे डे' संदेश दिला होता, अशी माहिती आता समोर येत आहे. अहमदाबाद येथील सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून



लंडन येथे जाण्यासाठी उड्डाण केलेल्या विमानाला गुरूवारी उड्डाणानंतर काही मिनिटांतच अपघात झाला.


नागरी विमान वाहतूक संचालनालयाने (डीजीसीए) दिलेल्या माहिती नुसार, 'एआय १७१' या बोइंग कंपनीच्या ड्रिमलायनर ७८७विमानाने गुरूवारी दुपारी एक वाजून ३८ मिनिटांनी धावपट्टी क्रमांक २३ वरून उड्डाण घेतले. त्यानंतर काही मिनिटांतच या विमानाच्या वैमानिकाने हवाई वाहतूक नियंत्रकाला 'मे डे' संदेश अर्थात विमान कोसळत असून मदतीची मागणी करणारा संदेश दिला. मात्र त्यानंतर काही क्षणातच विमानतळाजवळच्या परिसरातच हे विमान कोसळले आणि मोठा स्फोट होऊन आगीचे लोट आसमंतात उसळले.

'एआय १७१' विमानातील मुख्य वैमानिक कॅप्टन सुमीत सभरवाल यांना तब्बल आठ हजार २०० तास विमान उड्डाणाचा अनुभव होता, तर त्यांच्या बरोबर या विमानात सहवैमानिक असलेल्या क्लाईव्ह कुंदर यांना अकराशे तास विमान उड्डाणाचा अनुभव होता, अशी माहितीही डीजीसीएने दिली आहे. या विमानात दोघा वैमानिकांसह दहा कर्मचारीही होते.

## हे सरकार गेंड्याच्या कातडीचं आहे : प्रकाश महाजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ गुरुकुंज मोझरी**

बच्चू भाऊ तुम्ही चळवळीतून आला आहात. चळवळीतून आलेल्या कार्यकर्त्याला असं हतबल होऊन चालत नाही. परवाच सत्तेत बसलेल्या एका गुंडाला मी आव्हान देऊन आलेलो आहे. बच्चूभाऊ तुम्ही तुमच्या जीवाला त्रास करून घेऊ नका गेंड्याच्या कातडीच हे सरकार आहे हलके



लोक या सरकारमध्ये बसलेले आहेत. यांना शेतकरी, सर्वसामान्य लोकांचे काही पडलेले नाही. आता आपण उपोषण करायचे नाही आपण मंत्री घरात कोंडायचे आणि त्यांना उपोषण करायला लावायचे, अशा शब्दात छत्रपती संभाजी नगरचे मनसेचे नेते प्रकाश महाजन यांनी सरकारवर निशाणा साधला.

## 'सरकारने अंत्ययात्रेची तयारी करावी', मंत्री राठोड यांच्या विनंतीवरुन बच्चू कडूं संतापले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३गुरुकुंज मोझरी**

शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीच्या मागणीसह एकूण १७ मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष आणि माजी आमदार बच्चू कडू यांचं गुरुकुंज मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीसमोर आमरण अन्नत्याग आंदोलन सुरू केल आहे. ८ जूनपासून त्यांनी हे अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. आज उपोषणाच्या सहाव्या दिवशी बच्चू कडू यांची प्रकृती चांगलीच खालावली असून त्यांची भेट घेण्यासाठी शिवसेना शिंदे गटाचे मंत्री संजय राठोड आले होते. यावेळी संजय राठोड यांच्यासमोर बच्चू कडू यांनी



संताप व्यक्त केला.

आपली गरज महाराष्ट्राला आहे. आपण उपोषण मागे घ्यावे, आपल्या सहकाऱ्यांना उपोषण मागे घेण्यासाठी सांगावं, अशी विनंती यावेळी संजय राठोड यांनी केली.

शासनाचा मंत्री म्हणून बच्चू कडूंचा मित्र म्हणून मी बच्चू कडूंना भेटायला आलो आहे. बच्चू कडूंना आम्ही सहकारी समजतो. बच्चू कडूंच्या उपोषणावर शासनाचे लक्ष आहे. बच्चू कडूंना विनंती आहे, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासोबत हा विषय बोलणार आहे. बच्चू कडूंच्या सगळ्या मागण्यांवर मंगळवारी कॅबिनेटमध्ये चर्चा करू. बच्चू कडूंच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घ्या अशी विनंती करणार आहे. आपली गरज महाराष्ट्राला आहे. आपण उपोषण मागे घ्यावे, आपल्या सहकाऱ्यांना उपोषण मागे घेण्यासाठी सांगावं, अशी विनंती यावेळी संजय राठोड यांनी केली.मंत्री संजय राठोड यांची ही मागणी बच्चू कडू यांनी फेटाळून लावली. सरकारने आमच्या अंतयात्रेची तयारी करावी. सरकारने निर्णय करावा, आमच्या उपोषण सोडण्यापेक्षा निर्णय करण्यासाठी तुम्ही पाठपुरावा करावा, असे म्हणत बच्चू कडू उपोषण सुरु ठेवण्यावर ठाम राहिले. यावेळी बच्चू कडू यांच्या कार्यकर्त्यांनी मंत्री संजय राठोड यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजीही केली.

## इन्कम टॅक्स भरणाऱ्या बहिणींना नाही मिळणार लाडक्या बहीण योजनेचा लाभ? बहिणी शासनाच्या 'रडारवर'

### जिल्ह्यात ६ लाख २७ हजारांवर लाभार्थी महिला, केवळ ४५ महिलांनी लाभ नाकारला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही आर्थिक दुर्बल घटकातील महिलांसाठी राबविली जात आहे. मात्र, काही आर्थिक सक्षम महिलासुध्दा या योजनेचा लाभ घेत असल्याचा संशय शासनाला आहे. त्यामुळे इन्कम टॅक्स भरणाऱ्या लाडक्या बहिणींची शोधमोहीम सुरू होणार आहे.

काही दिवसांपूर्वी राज्यातील शासकीय कर्मचारी असलेल्या दोन हजार महिला लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत असल्याचा प्रकार उघडकीस आला होता. अशा लाभार्थ्यांची नावे आता कमी केली आहेत. अशातच आता राज्यासह जिल्ह्यातही इन्कम टॅक्स भरणाऱ्या लाडक्या बहिणींची शोधमोहीम सुरू होणार आहे. या योजनेत लाभार्थ्यांची नावे आहेत का? याची पडताळणी केली जाणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी तत्कालीन महायुती सरकारने



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली होती. या योजनेचे अर्ज स्वीकारण्यास १ जुलै २०२४पासून सुरुवात झाली. जवळपास सप्टेंबर महिन्यापर्यंत लाभार्थीचे अर्ज स्वीकारले होते. महायुती सरकार पुन्हा सत्तेवर आल्यानंतर आर्थिकरीत्या सक्षम असणाऱ्या महिलांची नावे वगळण्यास सुरुवात केली. मार्च २०२५ महिन्यात संजय गांधी निराधार, श्रवणबाळ योजना लाभार्थी यांची नावे कमी केली आहेत.

**त्या' बहिणींचा डेटा देण्यास परवानगी**

केंद्र सरकारने एका अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र सरकारच्या महिला आणि बालविकास सचिवांना आयकर भरणाऱ्या महिलांचा डेटा देण्यासाठी परवानगी दिली आहे. ही अधिसूचना ३ जून २०२५ रोजी केंद्रीय अर्थ मंत्रालयाच्या सचिव जया प्रकाश यांच्या मान्यतेने काढली. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थ्यांना लाभदेण्यासाठी आणि आयकर भरणाऱ्या महिलांना वगळण्यासाठी महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाच्या अर्थ खात्याकडे परवानगी मागितली होती. यास केंद्राने मंजुरी दिली.

## विमान थोडे पुढे गेले असते तर साबरमती नदीत उतरवले असते...

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अहमदाबाद**

एअर इंडियाच्या अहमदाबाद-लंडन एआय-१७१ विमानाचा झालेला अपघात हा पक्षी धडकल्याचा प्रकार वाटत नाही. वैमानिकाने विमान ज्या पद्धतीने खाली आणले, ते पाहता विमान अखेरपर्यंत सुरक्षित ठिकाणी नेण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. हा प्रयत्न अनुभवी वैमानिकच करू शकतो, असे मत या क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले. परंतु, ब्लॅक बॉक्समधून प्राप्त होणाऱ्या रेकॉर्डिंगच्या आधारे संपूर्ण सत्य समोर येईल. या घटनेनंतर काहींना १५ जानेवारी २००९ रोजीच्या यूएस एअरवेजच्या विमानाच्या अपघाताची आठवण झाली. यूएस एअरवेजच्या या ए३२० विमानाला पक्षी धडकल्यानंतर, वैमानिकाने ते हडसन नदीत उतरवले होते. या घटनेत कोणत्याही प्रवाशाचा मृत्यू झाला नव्हता. एअर इंडियाचे विमान-१७१ पुढे जाऊ शकले असते, तर ते साबरमती नदीत उतरवण्याचा प्रयत्न करता आला असता आणि प्रवाशांचे जीव वाचण्याची शक्यता वाढली असती. आपत्कालीन परिस्थितीत, जर विमान योग्यरीत्या उतरले तर ते काही काळ पाण्यात तरंगू शकते, असे तज्ज्ञांचे मत आहे.

सांध्य दैनिक **विदर्भ प्रजासत्ताक** https://epaper.vidarbhaprajasattak.com शुक्रवार दि. १३ जून २०२५


संपादकीय ......

# निवडणुकांचा बिगुल

लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे महत्त्व असते. याचे कारण या संस्था म्हणजे एकप्रकारे लोकशाहीचा पायाच असतो. हा पाया जितका मजबूत, तितकी लोकशाही सशक्त. या संस्थांच्या माध्यमातून सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. कोरोना आणि नंतर न्यायालयात ओबीसी आरक्षणाचा मुद्दा लटकल्यामुळे, या निवडणुका सातत्याने लांबणीवर पडत गेल्या. सर्वोच्च न्यायालयाने मे महिन्यात दिलेल्या आदेशानुसार, चार महिन्यांत म्हणजे सप्टेंबरपर्यंत निवडणुकीची प्रक्रिया पार पाडायची आहे. तसेच १९९४ ते २०२२ दरम्यान स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिलेल्या ओबीसी आरक्षणाच्या आधारावरच या निवडणुका घेतल्या जाणार आहेत; पण सप्टेंबरपर्यंत महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांची प्रक्रिया पार पडणे केवळ अशक्य आहे. अर्थात, सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला मुदत वाढवून देण्यासाठी अर्ज करण्याची मुभा दिली आहे.

महायुती सरकारने ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये या निवडणुका घेण्याची तयारी केली असून, त्यामुळे राज्यात पुन्हा निवडणुकांचा धुरळा उडणार आहे. पूर्वी प्रभाग रचनेचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे होते; पण उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात जानेवारी २०२२ मध्ये सरकारने ते स्वत:कडे घेतले. या अधिकारात राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने सर्व महापालिका आयुक्त तसेच जिल्हाधिकार्यांना प्रभागांची रचना करण्याचा आदेश दिला. नगरविकास विभागाने अ, ब, क वर्गातील १० महापालिकांची प्रभाग रचना करण्याचे आदेश संबंधित पालिका आयुक्तांना दिले, तर ड वर्गातील १९ महापालिकांची रचना करण्याचे आदेश जिल्हाधिकार्यांना दिले. त्यानुसार कार्यवाही होईल. 'मविआ'च्या ठाकरे सरकारने मुंबई महापालिकेतील सदस्य संख्या २३६ केली होती; पण शिंदे सरकारच्या काळात ही संख्या पुन्हा २२७ करण्यात आली.

मुंबई वगळता, अन्य महानगरपालिकांमध्ये चार सदस्यीय, नगरपालिकांमध्ये दोन सदस्यीय प्रभाग पद्धत ठेवण्यात येणार आहे. महाविकास आघाडी सरकारने महापालिका आणि नगरपालिकांमधील प्रभागांची संख्या वाढवली होती; मात्र शिंदे सरकारने ८ सप्टेंबर २०२२ रोजी आधीच्या रचनेनुसार प्रभागांची संख्या कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. नगरपालिकांमध्ये मात्र ठाकरे सरकारने जानेवारी २०२२ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार प्रभागांची संख्या कायम ठेवली. सत्ताधारी पक्ष नेहमीच सोयीनुसार प्रभाग रचनेसंबंधी निर्णय घेत असतात; मात्र लोकसंख्या व मतदार वाढतात, तेव्हा प्रभागांची संख्या वाढणे स्वाभाविक मानावे लागेल. मुळात प्रभाग रचना करताना, आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समिती निर्णय घेते. आयुक्तांनी प्रारूप प्रभाग रचना तयार करून ती राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवायची असते. आयोगाची मान्यता मिळाल्यानंतर प्रभागांचे प्रारूप जाहीर केले जाते. नंतर त्यावर हरकती व सूचना मागवण्यात येतात. त्यावर सुनावणी करून, प्रभागांची अंतिम रचना पुन्हा निवडणूक आयोगाकडे मंजुरीसाठी पाठवली जाते. आयोगाच्या मान्यतेनंतर प्रभागांची अंतिम रचना जाहीर केली जाते.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत असल्याने नगरपालिका, पंचायत समिती आणि महानगरपालिका या माध्यमातून राज्यात नवीन नेतृत्व तयार होण्याचा मार्ग मोकळा झाला. निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात सरळ सामना होणार हे जवळजवळ स्पष्ट आहे. विशेषत: अपवाद सोडता महायुती एकत्र लढणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी सांगून टाकले आहे. त्यातही महायुतीतील तिन्ही पक्ष प्रबळ असल्याने अनेक ठिकाणी ते आमने सामने येतील, काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होतील, तर बंडखोरीची शक्यताही अनेक ठिकाणी आहे. अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना यांच्यासमोर अस्तित्व राखण्याचे आव्हान आहे.

राज्यातील विकास प्रकल्प, त्यासाठी आणलेला निधी, डबल इंजिनचे सरकार या आधारावर महायुती प्रचारात उतरेल, असे दिसते. सरकारने एका वर्षात रेल्वे प्रकल्पांसाठी केंद्राकडून आणलेला निधी, यूपीए सरकारने १० वर्षांत महाराष्ट्राला दिलेल्या निधीपेक्षा अधिक असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे, याचाच अर्थ प्रचारात हा मुद्दा आणला जाऊ शकतो. राष्ट्रवादी काँग्रेसच्या २६व्या वर्धापनदिनी केलेल्या भाषणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही बेरजेच्या राजकारणासाठीच आम्ही महायुतीसोबत आहोत, असे वक्तव्य केले आहे, तर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी महायुती म्हणूनच आगामी निवडणुका लढवण्याचे संकेत दिले आहेत.




## वजन कमी करण्यासाठी बटाटे खाणं सोडलं? एक्स्पर्ट सांगतात, बटाट्यानं 'असं' होईल वजन कमी




**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक**

सध्या वाढत्या वजनाने आपल्यापैकी अनेकजण हैराण आहेत. वजन कमी करण्यासाठी आपण अनेक प्रयत्न करतो. वजन कमी करायचं असेल तर सर्वात आधी डाएट आणि एक्सरसाइज या दोन गोष्टींवर अधिक जास्त भर दिला जातो. यातही, काहीजण डाएट करताना अमुक - पदार्थ नको, तमुक एखादा पदार्थ खाल्ल्याने वजन वाढते असा समज करुन काही पदार्थ खाणे कायमचेच सोडून देतात. जेव्हा आपल्या मनात वेटलॉस करायचा विचार येतो तेव्हा, सर्वातआधी बटाटा खायचा बंद करण्याचा विचार आपल्या डोक्यात येतो.

बटाट्यामध्ये कार्बोहायड्रेटसचे प्रमाण जास्त असल्याने, बटाटा खाल्ल्याने आपले वजन वाढतेच असा अनेकांचा समज आहे. यासाठीच, जर वजन कमी करायचे असेल तर अनेकजण सगळ्यांत आधी बटाटा खाणेच सोडून देतात. परंतु खरंच बटाटा न खाल्ल्याने वजन कमी होते का ? किंवा वजन कमी करण्यासाठी बटाटा खाणेच कायमचे सोडून देणे योग्य की अयोग्य?

**वजन कमी करण्यासाठी बटाटा खाणेच सोडून देताय...**

डॉ. जतिन चौधरी यांच्या मतानुसार, बटाटे हे केवळ कार्बोहायड्रेट्सचे स्रोत नाहीत तर त्यामध्ये अनेक प्रकारचे पोषक घटक देखील असतात जे वजन कमी करण्यासाठी तसेच वजन संतुलित ठेवण्यास मदत करू शकतात. फक्त वजन कमी करताना बटाटा खाण्याची योग्य पद्धत आणि प्रमाण याचे काही नियम पाळल्यास वजन कमी करताना देखील आपण बटाटा खाऊ शकता.

**बटाटे नेहमी सालीसहित खावेत...**

वजन कमी करताना जर तुम्ही बटाटा खाणार असाल तर बटाटा नेहमी सालीसहितच खाण्याला प्राधान्य द्या. भाज्या शिजवत असाल तर बटाटे सालीसहितच शिजवा, यामुळे बटाट्यांमध्ये फायबरचे प्रमाण टिकून राहते आणि यामुळे आतड्यांचे कार्य सुरळीतपणे चालण्यास मदत होते. याशिवाय, बटाटे उकळून किंवा भाजून देखील आपण खाऊ शकतो. याशिवाय, तुमच्या रोजच्या कॅलरीजचे प्रमाण लक्षात घेऊनच मग बटाटे खा.

**प्रथिनयुक्त पदार्थांसोबतच बटाटे खा...**

वेटलॉस करताना जर बटाटे खायचेच असतील तर ते प्रथिनयुक्त पदार्थांसोबतच खावेत. उदाहरणार्थ, वेगवेगळ्या प्रकारच्या डाळी, कडधान्य आणि पालक यांसारख्या भाज्यांसोबतच बटाटे खावेत. बटाट्यामध्ये पोटॅशियम, व्हिटॅमिन 'सी' आणि व्हिटॅमिन 'बी' देखील असते, ज्यामुळे आपले पोट कायमच भरलेले राहते, त्यामुळे आपल्याला वारंवार खूप भूक लागत नाही आणि वजन नियंत्रण राहायला मदत होते.

**बटाटे दह्यासोबत खा...**

जर बटाटे खाऊनही वजन वाढवायचे नसेल तर ते दह्यासोबत खा. दह्यामध्ये असलेले प्रोबायोटिक्स पचन सुधारतात आणि बटाट्यातील कार्बोहायड्रेट्स बटाटा लवकर पचवण्यास मदत करतात. याशिवाय, दह्यामध्ये प्रथिने आणि गुड फॅट्स असतात, जे रक्तातील साखरेची पातळी स्थिर ठेवतात आणि वारंवार भूक लागण्यापासून रोखतात.

# राज्यातील अंशत: अनुदानित शाळेतील शिक्षक २० टक्के वाढीव टप्पा निधीपासून वंचित

## भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक चंद्रशेखर भोयर यांची मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे निधी देण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ अमरावती**

:राज्यातील अंशत: अनुदानित शाळेत कार्यरत शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी १४ ऑक्टोंबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार २० टक्के वाढीव टप्प्याच्या निधीपासून वंचितआहे. शासन निर्णयानुसार वाढीव टप्पा निधी मंजूर करून राज्यातील शिक्षकांना दिलासा द्यावा अशी महत्वपूर्ण मागणी भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक चंद्रशेखर भोयर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

राज्यातील अंशत: अनुदानित शाळांमध्ये तब्बल ७० हजार शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत असून त्यांना गेल्या अनेक महिन्यांपासून १४ ऑक्टोंबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार २० टक्के वाढीव टप्प्याचा निधी मिळालेला नाही. शासन निर्णय होऊ नये वाढीव टप्पा निधी न मिळाल्यामुळे शिक्षक आर्थिक संकटात सापडले आहे . हजारो शिक्षक आपल्याला वाढीव टप्प्याचा निधी मिळेल या आशेने एक मुख्यमंत्री म्हणून आपल्याकडे बघत असून आपण वाढीव टप्प्याचा निधी मंजूर करून या सर्व शिक्षकांना आर्थिक दिलासा द्यावा या महत्वपूर्ण मागणीसाठी भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक चंद्रशेखर भोयर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत विषयाचे गांभीर्य त्यांच्या लक्षात आणून दिले आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या दृष्टिकोनातून सदर मुद्द्याला महत्त्व देत शिक्षकांना दिलासा द्यावा अशी मागणी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे.

**पावसाळी अधिवेशनात विषय मार्गी लावणार :भोयर**

विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळेतील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना १४ ऑक्टोबर २०२४ शासन निर्णयानुसार टप्पा वाढ मिळावी व त्यासाठी लागणारा पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांनी याबाबत सकारात्मक भूमिका घेण्याची ग्वाही दिली आहे. येत्या पावसाळी अधिवेशनात हा मुद्दा निकाली निघून मार्गी लागावा यासाठी आपण सर्वांच्या मदतीने जोरकस प्रयत्न करणार आहे.वाढीव टप्प्यापासून वंचित असलेल्या राज्यातील हजारो शिक्षकांना दिलासा मिळावा यासाठी गेल्या काही महिन्यांपासून शासन दरबारी पाठपुरावा सुरू असून त्यामध्ये आपल्याला यश येईल व हजारो शिक्षकांना दिलासा मिळेल असा विश्वास भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक चंद्रशेखर भोयर यांनी व्यक्त केला आहे.

# विद्यापीठाची उन्हाळी-२०२५ बी.एस.सी. सेमि-६ (सी.बी.सी.एस.) रसायनशास्त्र विषयाची पुनर्परीक्षा १७ जून रोजी होणार आहे

## विद्यार्थ्यांनी नोंदवायचे विद्यापीठाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

संत गागेबाबा अमरावती विद्यापीठाची उन्हाळी - २०२५ बी.एस.सी. सेमि.-६ (सी.बी.सी.एस.) रसायनशास्त्र विषयाची पूनर्परीक्षा ब्रिजाल बियाणी विज्ञान तंत्रज्ञान (केंद्र क्र.१२५) या केंद्र केंद्र दि. १७, २०२५ रोजी सकाळी ९.०० ते पॉवर १२.०० या मतदानात १२.०० जून आहे. सदर योजनेच्या विध्यार्थीनी त्यांना प्रवेशपत्र आणावे, व मूल्यमापन विभाग असे कुल परीक्षा क्रमांक आले आहेत.

या सर्वसंबंधित लेखकांचे प्राचार्य केंद्राधिकारी, थेटे, परीक्षांना कळ आले असून, मला त्यांच्या विद्वानांच्या । तसेच विद्याथ्र सुध्दा याची नोंद करा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या वेबसाइटवर परीक्षा विभागाच्या अधिक-यांच्या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाने कळविले आहे.

# फळबाग लागवडीची योग्य वेळ कोणती? फळपिकांच्या पॉप्युलर जाती कोणत्या? वाचा सविस्तर




विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक**

आपल्याकडे जमीन कोणत्या प्रकारची आहे? आपल्या जमिनीत फळझाडे येतील का? बारमाही पाण्याची व्यवस्था आपल्याकडे आहे का? आपल्या हवामानात कोणत्या प्रकारची फळझाडे येऊ शकतील? ह्याचा अभ्यास फळबाग लागवडीपूर्वी करणे गरजेचे आहे.

**फळबाग लागवडीची योग्य वेळ कोणती?**

खात्रीशीर चांगला पाऊस झाल्यावर पावसाळ्याच्या सुरुवातीस जून महिना किंवा जुलै महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात करावी.

अतिपावसात अगर पावसाच्या शेवटी सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये फळझाड लागवड करू नये. पावसाच्या सुरुवातीस लागवड केलेली फळझाडे चांगली समाधानकारक वाढतात.

काही कालावधीकरिता पाण्याचा ताणही सहन करू शकतात. जून-जुलैपर्यंत वेळेवर झाडांची लागवड झाल्यास वाढ भक्कम जोमाने होते.

**फळबाग लावताना वाणांची निवड**

भरपूर उत्पादन क्षमता असणाऱ्या जातीची निवड करावी.

आपल्या भागासाठी शिफारशीत असावी. कीड व रोगास प्रतिकारक्षम असावी.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

**फळपिके आणि त्यांच्या जाती**

१) आंबा : केशर, हापूस, रत्ना, तोतापुरी, नीलम.

२) डाळिंब : भगवा, सुपर भगवा.

३) पेरु : सरदार एल-४९, ललित, अलाहाबाद सफेद, श्वेता.

४) सीताफळ : बाळानगर, फुले पुरंदर, फुले जानकी.

५) आवळा : कृष्णा, कांचन व निलम.

६) चिंच : पीकेएम-२६३, प्रतिष्ठान, अकोला स्मृती.

७) लिंबू : साई सरबती, फुले सरबती, प्रमालिनी, विक्रम, पीडीकेव्ही लाईम.

८) मोसंबी : काटोल गोल्ड, न्यूसेलर, फुले मोसंबी.

९) संत्रा : नागपुर संत्रा, नागपूर सीडलेस.

१०) जांभूळ : स्थानिक, कोकण बहाडोली.

११) चिकू : कालीपत्ती, क्रिकेटबॉल.

१२) अंजीर : दिनकर, फुले राजेवाडी.

# महानगरपालिका अतिक्रमण विभाग व समाज कल्याण विभागाद्वारे संयुक्तपणे अतिक्रमण काढण्याची कार्यवाही




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

झोन क्रमांक ०१ अंतर्गत चौधरी चौक ते सिंधी चौक, रामपुरी कॅम्प रोड, पर्यंत मुख्य रस्त्यावरील नागरिकांद्वारे सार्वजनिक फूटपाथ/नालीवरील सामाजिक न्याय विभाग असे नमूद असलेले गटई स्टॉल लोखंडी खोके, शासनाचे अटी शर्तीचे पालन न करता भाजीपाला,हॉटेल कॅन्टीन, टू व्हीलर वाहन दुरुस्ती गॅरेज, मास विक्री, पानठेले,व काही ठिकाणी हुबेहूब डुप्लिकेट खोके लावून मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले आहे. त्यामुळे रहदारीस अडचण निर्माण होत असल्यामुळे तातडीने सदर अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश मा.आयुक्त व मा. उपायुक्त प्रशासन यांनी दिले.

दिनांक १२/०६/२०२५ रोजी दुपारी १२.३० ते दुपारी ३..३० वाजेपर्यंत सदर अतिक्रमण जे.सी.बी. मशिनीद्वारे काढण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. सदर कार्यवाही मध्ये १० गटई स्टॉल जप्त करण्यात आलेले आहे,

सदर कार्यवाही मध्ये समाज कल्याण विभागाचे प्रतिनिधी, निरीक्षक श्री. ऋषिकेश तायडे,अतिक्रमण निर्मूलन पथक प्रमुख ,श्री. योगेश कोल्हे, निरीक्षक अन्सार अहमद, शुभम पांडे, ससनर विभागाचे जागा निरीक्षक, श्री भांडे, पोलीस कर्मचारी श्री. सुरेश हिरुरकर व अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

शुक्रवार दि. १३ जून २०२५

शहर/ग्रामिण


# अहमदाबाद विमान दुर्घटनेमुळे भाजपचे कार्यक्रम पत्रकार परिषदा रद्द; काँग्रेसचा मशाल मोर्चाही रद्द

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१३पुणे

अहमदाबाद विमान दुर्घटनेमुळे पुण्यातील भारतीय जनता पक्ष व काँग्रेस यांचे कार्यक्रम रद्द करण्यात आले. गुजरातमध्ये गुरुवारी सकाळी हा भीषण अपघात झाला. त्याची दखल घेत कार्यक्रम रद्द करण्यात आले. विमान दुर्घटनेत २४२ प्रवाशांनी किंवा गमावला आहे. या दुर्दैवी घटनेचा शोक व्यक्त करत सर्व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम, मोर्चे रद्द केले आहेत.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ११ वर्षांच्या कार्यकाळाची माहिती देण्यासाठी केंद्र सरकारने देशातील सर्व राज्यांमधील मोठ्या शहरांमध्ये केंद्रीय मंत्र्यांसह स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या पत्रकार परिषदांचे आयोजन केले होते. पुण्यात गुरुवारी दुपारी पक्ष कार्यालयात पक्षाचे राष्ट्रीय महामंत्री अरुण सिंह तसेच राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांची पत्रकार परिषद होणार होती. मात्र, विमान अपघाताची माहिती समजल्यानंतर भाजपने देशातील या सर्व पत्रकार परिषदा रद्द करण्याचा निर्णय जाहीर केला. त्यानुसार पक्षाचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी पक्ष कार्यालयात उपस्थित राहून ही पत्रकार परिषद रद्द केली असल्याचे सांगितले. शेलार यांच्या उपस्थितीतील अन्य कार्यक्रमही रद्द करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

काँग्रेसने राज्यात सर्वत्र मशाल मोर्चाचे आयोजन केले होते. राज्याच्या विधानसभा निवडणुकीमध्ये गैरप्रकार झाल्यासंबंधी पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी जाहीर आरोप केले होते. त्याविषयी जनजागृती करण्यासाठी हे मशाल मोर्चे होते. पुण्यातील मोर्चा शनिवारी (दि.१४ जून ) आयोजित केला होता. तो रद्द केला असल्याचे पक्षाच्या वतीने कळवण्यात आले. मोर्चाची पुढील वेळ नंतर जाहीर करण्यात येणार आहे, असे सांगण्यात आले.

### बच्चू कडू यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ राज्यव्यापी चक्काजाम आंदोलन १५ जून रोजी होणार

शेतकऱ्यांच्या कर्जमाफी यासह १७ मागण्यासाठी बच्चू कडू हे गुरुकुंज मोझरी येथे गेल्या सहा दिवसापासुन अन्नत्याग आंदोलन करीत आहे, अद्याप मागणी पूर्ण न नसल्याने प्रहार व शेतकऱ्यांच्या विविध संघटना व विरोधी पक्षाचे वतीने शनिवारी रास्तारोको चक्का जाम आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता,मात्र अहमदाबाद येथे विमान दुर्घटनेत बळी पडलेल्या निष्पाप नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली व त्यांच्या कुटुंबा प्रती शोक संवेदना म्हणून पाठिंबा देणाऱ्या सर्व नेते,सामाजिक संघटना,आणि आंदोलकांच्या निर्देशानुसार १४ जून चे राज्यव्यापी चक्का जाम आंदोलकांच्या एकत्रित निर्णयानुसार एक दिवस पुढे ढकलून १५ जून रोजी करण्यात येईल अशी माहिती प्रहार संघटनेचे पदाधिकारी यांनी दिली

## १५ लाख रुपये लुटल्याची खोटी माहिती देणारा गजाआड

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१३अमरावती

पंधरा लाख रुपये लुटल्याची खोटी माहिती पोलिसांना देणारा आरोपी पोलिसांनी अटक केला आहे. ११ जून रोजी आरोपी अंकुश अरुण राऊत (३२) रा. नेर जिल्हा यवतमाळ यांनी नांदगाव खंडेश्वर पोलिसांत कॉल करून सांगितले की, महिला अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी अमरावती येथील मॅनेजिंग डायरेक्टर असून तो नेर जिल्हा यवतमाळ येथून कुऱ्हा जिल्हा अमरावती ग्रामीण येथील सोसायटीचे शाखेत पैसे जमा करण्याकरिता पंधरा लाख रुपये घेऊन दुचाकीने जात असताना तोंडाला रुमाल बांधलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्याच्या गळ्याला चाकू लावून पंधरा लाख रुपयांचीरक्कम हिसकावून पळाले.या घटनेचा तपास सुरू असताना गुप्त माहितीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार हा असा प्रकार घडला नसल्याचे समजले. आरोपी अंकुश अरुण राऊत याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने पोलिसांना गुन्हा घडल्याची खोटी माहिती दिल्याचे कबूल केले. याप्रकरणी आरोपी अंकुश राऊत यांच्यावर कलम २१२ (ए) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, पंकज कुमावत, अशोक थोरात, किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात अमोल तुडजेवार,तसलीम शेख, मुलचंद भांबुरकर,अमोल देशमुख, मंगेश लकडे,सचिन मसंगे, दिनेश कनोजियायांनी केली.

# जिल्ह्यात प्रत्येकाला 'आयुष्यमान'चा लाभ; ३६ रुग्णालयांची उपलब्धता : समितीचे राज्याध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांची माहिती



विदर्भ प्रजासत्ताक
दि.१३अमरावती

जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आरोग्य सेवा मिळावी, यासाठी आरोग्य योजनेत सर्व घटकांचा समावेश करण्यात आला आहे. यासोबतच सक्षम असलेल्या सर्व रुग्णालयांनी अर्ज केल्यास त्यांचेदेखील संलग्नीकरण करण्यात येईल, अशी माहिती आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी दिली. या योजनेची उपलब्धता असलेली जिल्ह्यात ३६ रुग्णालये आहेत.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात गुरुवारी आयुष्मान भारत योजनेच्या अंमलबजावणीबाबत बैठक घेण्यात आली. या वेळी आमदार प्रताप अडसड, आ. प्रवीण तायडे, आ. राजेश वानखडे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा शल्यचिकित्सच डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले, जिल्हा महिला रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. विनोद पवार, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे प्रशासकीय अधिकारी मंगेश मेंढे, योजनेच्या जिल्हा समन्वयक डॉ. अंकिता मटाले, आरोग्य मित्र यंत्रणेचे गजानन पांडे आदी उपस्थित होते.

डॉ. शेटे म्हणाले, राज्य शासनाने राज्यातील सर्व नागरिकांना आरोग्य सेवा पुरवण्याचा निर्णय घेतला आहे. यात सर्व रेशन कार्डधारक पात्र असतील. एका कुटुंबाला ५ लाखापर्यंत मोफत उपचार आयुष्यमान भारत योजनेचा आढावा घेताना समितीचे प्रदेशाध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे. शेजारी जि.प. सीईओ, अन्य अधिकारी. अहवाल सादर करण्यासाठी उपस्थित झालेले आरोग्य सेवेतील अधिकारी-कर्मचारी. मिळणार आहे. त्यासोबतच बहुतांश आजार या योजनेत समाविष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व नागरिकांवर उपचार होतील. जिल्ह्यात ३६ रुग्णालये अंगीकृत करण्यात आली असून, येत्या काळात आणखी काही रुग्णालये यात जोडण्यात येतील. रुग्णांना सेवा देणाऱ्या रुग्णालयांनी अर्ज केल्यानंतर सक्षम असल्याची खात्री करण्यात येईल. या सर्वांना योजनेत जोडण्यात येणार आहे. जिल्ह्यातील अंगीकृत रुग्णालयांची माहिती नागरिकांना व्हावी, यासाठी गावपातळीवरील शासकीय कार्यालयांमध्ये याची यादी प्रसिद्ध करावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

अध्यक्ष शेटे यांच्या मते, शासनातर्फे येत्या काळात नवसंजीवनी उपक्रम राबवण्यात येणार आहे. यात राज्यभरातील २०० अवयव प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. यासाठी उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीचाही (सीएसआर) उपयोग केला जाणार आहे. जिल्ह्यातील मेळघाटसारख्या अतिदुर्गम भागात अनेक रुग्ण शस्त्रक्रियेची वाट पाहात आहेत, त्यांना उपक्रमाचा फायदा होणार आहे.

# दर्यापूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ६ हजार ५७८ विद्यार्थ्यांना मिळणार गणवेश

## शिक्षण विभागाने १९ लाख ७३ हजार ३४० रुपयांचा निधी मंजूर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१३दर्यापूर

नविन शैक्षणिक वर्षातील शाळेला २३ जूनपासून सुरुवात होत आहे. दर्यापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये पहिल्याच दिवशी ६ हजार ५७८ विद्यार्थ्यांना पुस्तका बरोबरच गणवेशही आणि सोबत बूट आणि दोन पायमोजे जोडही दिले जाणार आहेत. यासाठी शिक्षण विभागाने १९ लाख ७३ हजार ३४० रुपये निधी दिला आहे. तो निधी पंचायत समिती स्तरावर प्राप्त झाला आहे.



दर्यापूर शहर व तालुक्यात जिल्हा परिषद व नगर परिषदेच्या १ ली ते आठवी पर्यंतच्या १४२ शाळा असून या शाळेमधील ६ हजार ५७८ विद्यार्थ्यांना गणवेश आणि बूट व पायमोजे देण्यासाठी निधीही उपलब्ध झाला आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके सोबतच गणवेश बूट आणि पायमोजे दिल्या जाणार आहेत. या मध्ये ३ हजार २३४ मुली तर ३ हजार ३४४ मुले आहेत. अशा प्रकारे जिल्हा परिषद १२९ व नगरपालिकेच्या १३ अशा एकूण १४२ शाळा तालुक्यात आहे.

या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे. म्हणून शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके आणि गणवेश वाटप करण्याचे शासनाचे धोरण आहे. प्रति गणवेश ३०० प्रमाणे १९ लाख ७३ हजार ३४० रुपये प्राप्त झाले असून गणवेश सोबतच विद्यार्थ्यांना एक बूट आणि दोन जोड पाय मोजे मिळणार आहेत. तर प्रती विद्यार्थ्यांना एक बूट आणि दोन पायमोजे साठी ११ लाख ६३ हजार ९९० रुपये प्राप्त झाली असल्याची माहिती पंचायत समितीचे प्रभारी गटशिक्षण अधिकारी संतोष घुगे यांनी दिली. या विद्यार्थामध्ये एससी, एसटी, बीपीएल मधील मुले आदी मुलांचा समावेश असणार आहे.

**गणवेशाकरिता उपलब्ध करून दिला जाणार निधी :**
यावर्षी शाळेच्या सुरवातीला विद्यार्थ्यांच्या शालेय गणवेशाकरिता निधी शासनातर्फे देण्यात येणार आहे. ही आनंदाची गोष्ट आहे. मात्र ३०० रुपयात गणवेश आणी १७० रुपयात पायमोजे कुठे मीळतात. याबद्दलची माहिती सुद्धा शासनाने द्यावी. आजच्या महागाईच्या मानाने गणवेशाकरिता उपलब्ध करून दिला जाणार निधी खुपच अपुरा आहे. त्यात योग्य प्रमाणात वाढ केली. तरच या योजनेचा लाभार्थ्यांना फायदा होईल, असे नीलेश पुंडकर यांनी सांगितले.

# भारतीय जनता पार्टी विदर्भ विभाग बैठक प्रा.राम मेघे कॉलेज ऑफ इंजीनियरिंगमध्ये संपन्न

## भाजपा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची विशेष उपस्थिती

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१३अमरावती

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष श्री रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये विभाग निहाय संघटनात्मक बैठकीचा धडाडा सुरू आहे, याच अनुषंगाने अमरावती येथील बडनेरा रोड स्थित प्रा . राम मेघे इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये विदर्भ विभाग आढावा बैठक आयोजित करण्यात आली,भारतीय जनता पार्टीचा संघटनात्मक ढाचा मजबूत करण्यासाठी, संघटनात्मक रचना त्याची बांधणी पूर्ण करण्यासाठी, काही दिवसांपूर्वीच नव्याने झालेले सर्व जिल्हाध्यक्ष व मंडळ अध्यक्ष यांच्या घोषणेनंतर प्रथमच अमरावतीमध्ये ही आढावा बैठक कार्यकारी अध्यक्ष यांनी घेतली,भारत मातेचे पूजन व दीप प्रज्वलन करून सुरू झालेल्या या कार्यक्रमाला गडचिरोली ते बुलढाणा अशा विदर्भातील भाजपा संघटनात्मक दृष्ट्या ३०९ मंडळ आणि १९ जिल्हे ७ प्रदेश पदाधिकारी व तसेच




अमरावती शहर व ग्रामीण मधील सर्व प्रमुख पदाधिकारी या बैठकीमध्ये सामील झाले,भाजपा अमरावती शहर जिल्ह्याचे अध्यक्ष डॉ. श्री नितीनजी धांडे यांनी विदर्भाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे स्वागत आपल्या प्रस्ताविकामधून केले.यानंतर भाजपा विदर्भ विभागाचे संघटन मंत्री डॉ. श्री उपेंद्रजी कोठेकर यांनी संपूर्ण उपस्थितीचा आढावा घेतला,भाजपा महाराष्ट्र प्रदेशाचे कार्यकारी अध्यक्ष यांनी आपल्या संबोधनामध्ये सांगितले की भाजपाची खरी ताकद म्हणजे संघटन शक्ती आहे, आज महाराष्ट्रामध्ये चांद्या पासून ते बांदया पर्यंत भारतीय जनता पक्ष जो मजबूत झालेला आहे त्याचे खरे कारण म्हणजे संघटन शक्ती आहे, हीच संघटन शक्ती अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने संपूर्ण जिल्हा मंडळ रचना पूर्ण करण्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे तसेच राज्यामध्ये लवकरच होणाऱ्या जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका,पंचायत समिती अशा सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीकरिता सुद्धा भाजपा अधिक मजबूत करावी, या सोबतच केंद्र सरकारच्या व राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजना ह्या जनतेपर्यंत पोहोचवून सर्वसामान्य कुटुंबाला केंद्रातील नरेंद्र मोदींचे सरकार व राज्यातील देवेंद्र फडणवीस यांचे सरकार यांच्या सर्व योजनेचा लाभ द्यावा असे आवाहन सुद्धा रवींद्र चव्हाण यांनी यावेळी केले,एवढेच नव्हे तर ही संयुक्तिक बैठक संपल्यानंतर प्रत्येक जिल्ह्याची वेगळी बैठक सुद्धा रवींद्र चव्हाण यांनी स्वतः घेतली व कार्यकर्त्यांच्या सोबत हितगुज केलेयावेळी व्यासपीठावर भाजपा महाराष्ट्र प्रदेश महामंत्री सौ माधवी ताई नाईक, विदर्भ विभाग संघटन मंत्री डॉ श्री उपेंद्रजी कोठेकर, आमदार श्री चैनसुखजी संचेती, आमदार श्री प्रवीणजी तायडे,आमदार श्री राजेशजी वानखडे, आमदार सौ श्वेताताई महाले, भाजपा अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष डॉ. नितीनजी धांडे, अमरावती जिल्हा ग्रामीण (मोर्शी) चे जिल्हाध्यक्ष रविराजजी देशमुख, अमरावती जिल्हा ग्रामीण (मेळघाट ) चे जिल्हाध्यक्ष प्रभुदासजी भिलावेकर,प्रदेश उपाध्यक्ष श्री संजयजी भेंडे, प्रदेश सचिव श्री जयंतजी डेहनकर, सौ .सरिताताई गाखरे, प्रवक्ते शिवरायजी कुलकर्णी, श्री संजयजी फांजे,ज्येष्ठ नेते श्री किरणजी पातुरकर, सौ. किरणताई महल्ले प्रा. रवींद्रजी खांडेकर, प्रा. दिनेशजी सूर्यवंशी, इत्यादी उपस्थित होतेकार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाजपा युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस बादल कुलकर्णी यांनी केलेयावेळी कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे भाजपा अमरावती शहर जिल्ह्याच्या वतीने स्वागत हराने भव्य स्वागत अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष डॉ.नितीन धांडे ,सुनील काळे, ललित समदूरकर, सचिन रासने, राजू कुरील, विवेक ढोबळे, प्रफुल्ल बोके, मनीष चौबे,छोटू वानखडे, सचिन नाईक, संतोष कावरे, राधा कुरील, भारती गुहे,सुरेखा लुंगारे, रीता मोकलकर यांनी केले, विविध जिल्ह्यातून येणाऱ्या सर्व पदाधिकाऱ्यांची नोंदणी करून घेण्याची जबाबदारी किरणताई देशपांडे, सौ बरखा बोझे, संगीता तोंडे, यांनी पूर्ण केली

# कौंडण्यपूर येथून देशी पिस्टल, काडतूस व दोन तलवारी जप्त : कुऱ्हा पोलिसांची कारवाई; सात आरोपी जेरबंद

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१३कौंडण्यपूर

कौंडण्यपूर शेतशिवारात पोलिसांनी धाड टाकून अवैधरित्या पिस्टलस जिवंत कारतूस व दोन धारदार तलवारी जप्त केल्या आहेत.



कुऱ्हा पोलिसस्टेशन हद्दीतील कौंडण्यपूर येथे गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी धाड टाकून आरोपी शेख शानू शेख जब्बार (३५) रा.इलवारा बाजार वर्षा, अनिल सुरेश परीवाल (४२) रा. महादेवपुरा वर्धा, शेता शाहरुख शेख रऊफ, रा. महाराणा प्रताप वार्ड आर्वी, मोहम्मद आफर मोहम्मद यात्तिन (३०) रा. गौरक्षण वार्डआर्वी, आदित्य किशोर डाकोडे (२०) रा. देऊळवाडा ता. आर्वी जि. वर्धा, शेख साबीर शेख कबीर (३५) रा. जनता नगरआर्वी, प्रतीक बाबाराव ठाकरे (२२) रा. रेल्वेस्टेशन वर्धा त्यांना ताब्यात घेऊन शेतातील खोली व खोलीच्या मागे पाहणीकेली असता दोन तलवारी मिळून आल्या. तसेच तिथे उभे असलेल्या चारचाकी वाहन क्रमांक एम. एच. ३१ सी.एन. ३५९९ च्या डिक्कीमध्ये पिशवीत देशी बनावटीचे पिस्टल व दोन कारतूस, एक दुचाकी क्रमांक २७ बी. यु. ७२७९ असा एकूण दोन लाख ८६ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक विशालआनंद, पंकज कुमावत, अनिल पवार, पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात सपोनि वाकडे, विलास थुल, रामेश्वर सपाटे, योगेंद्र लाड, अनिल लिंगोट, उमेश वाघमारे, ज्ञानेश्वर देवलके, सागर निमकर, दर्पण बनसोड, अक्षय विरघट यांच्या पथकाने केली.

# विष प्राशन करून वृद्ध शेतकऱ्याने संपविले जीवन

## ब्राह्मणवाडा भगत येथील घटना

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१३नांदगाव पेठ

जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी आंदोलन पेटलेले असताना, दुसरीकडे अमरावती तालुक्यातील ब्राह्मणवाडा भगत येथील वृद्ध शेतकरी भाऊराव नथुजी गोंडाने (वय ८२) यांनी कर्जाच्या असह्य ओझ्यामुळे विष प्राशन करून आत्महत्या केली.सतत होणारी नापिकी,कर्जाचे वाढते डोंगर यामुळे त्यांनी गुरुवारी सकाळी आपल्या शेतात जाऊन फवारणीसाठी वापरण्यात येणारे विषारी औषध प्राशन करून आपली जीवनयात्रा संपविली. घटनेची माहिती मिळताच ब्राम्हणवाडा भगत येथीलसरपंच शंतनु निचित तसेच गावकऱ्यांनी तातडीने घटनास्थळ गाठून याबाबत माहुली जहागीर पोलिसांना घटनेची माहिती दिली.पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणी करिता जिल्हा सामान्य रुग्णालयात रवाना केला. सायंकाळी ७ वाजता गावातील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार पार पडले. एकीकडे गुरुकुंज मोझरी येथे माजी आमदार बच्चू कडू शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी अन्नत्याग आंदोलन करत आहेत, तर दुसरीकडे एक वृद्ध शेतकरी कर्जासमोर हतबल होऊन मृत्यूला कवटाळतो हे सरकारच्या असंवेदनशीलतेचं आणि अपयशाचं जिवंत चित्र आहे.या घटनेने कुटुंबावर तसेच गावात शोककळा पसरली आहे.

# महाराष्ट्रातील अनेक कुटुंबांवर कोसळले ‘दु:खाचे आकाश’



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ अहमदाबाद**

अहमदाबाद येथून लंडनच्या दिशेने निघालेले एअर इंडियाचे विमान गुरुवारी दुपारी उड्डाण केल्यानंतर काही मिनिटांतच ते कोसळले व आग लागून भस्मसात झाले. बोईंग ७८७ ड्रीमलाइनर प्रकारातील या विमानात ११ लहान मुलांसह २४२ जण होते. या विमानामधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये आणि कर्मचाऱ्यांमध्ये महाराष्ट्रातील प्रवाशी आणि कर्मचाऱ्यांचा समावेश होता. त्यामुळे राज्यातील अनेक कुटुंबावर या अपघातामुळे दु:खाचं आकाश कोसळलं आहे.

### खासदार तटकरे यांच्या भाच्याच्या पत्नीचा मृत्यू

विमान अपघातात अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांचे भाचे अमोल महाडिक यांच्या पत्नी अपर्णा यांचा मृत्यू झाला.



त्या विमानात सिनिअर क्रु-मेंबर म्हणून काम करीत होत्या. या घटनेची माहिती कळताच राज्याच्या महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे मुंबईतील गोरेगाव येथील महाडिक यांच्या घरी पोहोचल्या. खासदार तटकरे यांच्या मोठ्या भगिनीच्या अपर्णा या सूनबाई होत्या. त्यांचे पतीसुद्धा एअर इंडियामध्ये कार्यरत आहेत. महाडिक कुटुंब मुंबईतील गोरेगाव येथे वास्तव्यास आहे.

### एक दिवस आधीच आई-वडिलांना भेटून गेली होती मैथिली

अहमदाबादहून लंडनसाठी उड्डाण केलेल्या एअर इंडियाच्या अपघातग्रस्त विमानात एअर होस्टेस म्हणून काम करत असलेल्या पनवेल तालुक्यातील न्हावा गावातील मैथिली मोरेश्वर पाटील (२२) हिचाही समावेश आहे.



विमान अपघाताची खबर मिळताच कुटुंबीय गुरुवारी दुपारीच अहमदाबादकडे रवाना झाले असल्याची माहिती निकटवर्तीय जितेंद्र म्हात्रे यांनी दिली.

मैथिली मागील दोन वर्षांपासून एअर इंडियामध्ये क्रू मेंबरमध्ये एअर होस्टेस म्हणून काम करत होती. गुरुवारी अहमदाबादहून लंडनकडे रवाना होणाऱ्या विमानात मैथिलीची ड्युटी होती. त्यामुळे विमान दुर्घटनेच्या आदल्या दिवशी बुधवारी मैथिलीने आपल्या आई-वडील व कुटुंबीयांसोबत पूर्ण दिवसभराचा वेळ व्यतित केला. त्यानंतर गुरुवारी सकाळीच मुंबईमार्गे मैथिली मुंबईहून अहमदाबाद येथील एअरपोर्टला रवाना झाली होती. त्यानंतर एअर इंडियाचे हे विमान १२ क्रू सदस्यांसह २४२ प्रवाशांना घेऊन अहमदाबादवरून लंडनला जात असतानाच रहिवासी भागात दुर्घटनाग्रस्त झाले. मैथिलीचे वडील, आई, मामा तातडीने अहमदाबादकडे रवाना झाले.

### लंडनमधील मुलाला भेटण्यासाठी निघालेल्या माता-पित्याचा मृत्यु




लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान गुरुवारी दुपारी उड्डाणानंतर कोसळले. या दुर्घटनेत सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील हातीद गावातील महादेव तुकाराम पवार (वय ६८) व आशाबेन महादेव पवार (वय ६०) या दाम्पत्याचा समावेश आहे. १८५ व १८६ नंबरच्या आसनावर महादेव व आशाबेन बसले होते. या दोघांना दोन मुले आहेत. एक मुलगा लंडनमध्ये असून, दुसरा मुलगा गुजरातमध्ये चालक म्हणून काम करतो. गुरुवारी दुपारी महेश पवार हे विमानतळावर महादेव व आशाबेन यांना सोडायला गेले होते. सोडून बाहेर आल्यावर विमान अपघाताची माहिती कळाली अन् त्याने कुटुंबीयांना माहिती दिली.

### कापड मिलमध्ये होते नोकरीला

पवार कुटुंबीय हे नडीयाद (जि. खेडा, राज्य - गुजरात) येथे राहण्यास आहेत. नडीयाद (गुजरात) येथील कापड मिल येथे काम करत होते. सध्या निवृत्त झाले होते. गुरुवारी ते दोघे लंडनमध्ये राहणाऱ्या मुलाकडे एअर इंडियाच्या विमानाने जात होते. दोघेही अपघातात मरण पावले. ही माहिती महेश पवार यांनी हातीदच्या नातेवाइकांना कळविली. हातीद येथे शोककळा पसरली आहे.

### दीपक आम्हाला सोडून जाणार नाही बहीण श्रुती यांचा आक्रोश

अहमदाबादहून लंडनला निघालेल्या अपघातग्रस्त विमानात माझा भाऊ व विमानातील केबिन क्रू दीपक पाठक होता. आमचा भाऊ आम्हाला सोडून जाणार नाही, असा माझा विश्वास आहे. माझा देवावर भरवसा आहे, अशा शब्दांत दीपकची बहीण श्रुती पाठक हिने आपल्या भावना व्यक्त केल्या.



लंडनला उड्डाण करण्यापूर्वी दीपक यांनी आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर पोस्ट टाकून ते अपडेट केले होते. अहमदाबाद विमान दुर्घटनेतील प्रवासी, दहा कर्मचाऱ्यांसह २४२ जणांमध्ये बदलापूरचे दीपक पाठक यांचा समावेश आहे. दीपक पंधरा वर्षांपासून एअर इंडियात नोकरीला आहेत. गुरुवारी सकाळी टेकऑफ करण्यापूर्वी त्यांनी सोशल मीडियात पोस्ट टाकून अपडेट केले होते. विमानाला अपघात झाल्याची बातमी समजताच शेजाऱ्यांसह स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांच्या घराकडे धाव घेतली. दीपकचा चार वर्षांपूर्वी विवाह झाला. आजही आम्ही आशावादी आहोत. जोपर्यंत अपघाताची सर्व माहिती उघड होत नाही, तोपर्यंत आम्ही कोणतीही बाब मान्य करणार नाही, असे श्रुती म्हणाल्या. दीपक यांना दोन बहिणी आहेत.

### क्रू मेंबर रोशनीचे एअर होस्टेस व्हायचे स्वप्न राहिले अधुरे

अहमदाबाद विमान दुर्घटनेत डोंबिवली पूर्वेतील रहिवासी रोशनी सोनघरे (२७, रा. उमिया बिल्डिंग) हिचे निधन झाले. ती दोन वर्षांपासून एअर इंडियात क्रू मेंबर म्हणून कामाला होती. तिला एअर होस्टेस व्हायचे होते. ते तिचे स्वप्न अधुरे राहिल्याची खंत कुटुंबीयांनी व्यक्त केली.



तिच्या पश्चात आई, वडील, भाऊ, असा परिवार आहे. भाऊ विघ्नेश हा शिपिंग कंपनीत कामाला आहे. वडील राजेंद्र सोनघरे टेक्निशियन म्हणून काम करतात. रोशनी या आधी स्पाइस जेट या विमान कंपनीत कामाला होती. लहानपणापासूनच तिचे एअर होस्टेस होण्याचे स्वप्न होते. आई राजश्री हिच्याशी ती अपघातापूर्वी सकाळी फोनवर बोलली होती, तेच तिचे घरच्यांशी शेवटचे संभाषण झाल्याचे सांगण्यात आले. घटना कळताच तिचे वडील, भाऊ अहमदाबाद येथे रवाना झाले. आई घरीच असून, आईचा भाऊ रोशनीचा मामा प्रवीण सुखदरे यांनी ही माहिती दिली. डोंबिवलीतआधी ते ग्रँटरोड येथे वास्तव्याला होते.

# ...तर वाचला असता यशा रुद्र अन् रक्षा यांचा जीव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३नागपूर**

नागपूरच्या क्वेटा कॉलनीतील रहिवासी मनीष नेमचंद कामदार यांची मुलगी यशा कामदार - मोढा हिच्या सासऱ्यांचा महिनाभरापूर्वी अहमदाबादमध्ये कॅन्सरमुळे मृत्यू झाला. लंडनमधील त्यांच्या आप्तस्वकियांनी शोकसभेचे आयोजन केले होते. या शोकसभेला जाण्यासाठी यशा कामदार-मोढा, तिचा चिमुकला रुद्र मोढा आणि सासू रक्षा मोढा हे गुरुवारी दुपारी विमानतळावर गेले. परंतु, काही महिन्यांपूर्वी अहमदाबादमध्ये स्थायिक झाल्यामुळे त्यांच्याकडे लंडनला जाण्यासाठी काही कागदपत्रं कमी होती. विमान कंपनीने त्यांना प्रवासाची परवानगीही नाकारली. यशाचे पती किशन त्यांना घरी परत नेण्यासाठी विमानतळावर आले. परंतु, ऐनवेळी यशाची सासू रक्षा यांनी एअर इंडिया कंपनीची समजूत घातल्यामुळे त्यांना प्रवासाची परवानगी देण्यात आली अन् काही वेळातच त्यांच्यावर काळाने झडप घातली. विमान कंपनी आपल्या अटी, शर्तीवर कायम राहिली असती, तर या



तिघांचाही मृत्यू टळला असता.

यशा मनीष कामदार हिचे लग्न तीन वर्षांपूर्वी लंडनमधील किशन मोढा यांच्यासोबत झाले होते. लंडनमध्ये किशन मोढा यांचा फरसाणचा मोठा व्यवसाय होता. परंतु, नातेवाइक राहात असल्यामुळे आणि किशन यांच्या वडिलांवर कॅन्सरचे उपचार सुरू असल्यामुळे त्यांचे नेहमीच अहमदाबादला येणे-जाणे होते. यातच काही दिवसांपूर्वी मोढा कुटुंबीयांनी आपला लंडनमधील व्यवसाय बंद करून अहमदाबादमध्ये बायोमास पॅलेट फॅक्टरी म्हणजे कचऱ्यापासून इंधन तयार करण्याचा प्लान्ट सुरू केला होता. किशन मोढा यांचा व्यवसाय चांगला सुरू असताना महिनाभरापूर्वी त्यांच्या वडिलांचे कॅन्सरमुळे निधन झाले. अहमदाबादमध्येच त्यांचा अंत्यविधी करण्यात आला. परंतु, इतकी वर्षे लंडनला राहिल्यामुळे तेथेही मोढा कुटुंबीयांचे नातेसंबंध निर्माण झाले होते.

याच संबंधातून तेथील काही नागरिकांनी किशन यांच्या वडिलांच्या निधनाबद्दल शोकसभा आयोजित केली होती. याच शोकसभेला यशा, तिचा चिमुकला रुद्र आणि सासू रक्षा जात होते. परंतु, व्यवसायाच्या कारणामुळे यशाचे पती किशन यांनी मी पाच-सहा दिवसानंतर लंडनला येतो, असे सांगितल्याने तिघे लंडनला निघाले. त्यांचे विमान अवकाशात झेपावताच काही वेळातच त्यांच्या विमानाला अपघात होऊन काळाने त्यांच्यावर झडप घातली.

# ऑनलाइन प्रक्रियेने वाढवला गोंधळ; ३२००चे उद्दिष्ट अन् अर्ज आले १३२

# महाडीबीटीचा सर्व्हर डाऊन : बियाणे नोंदणीही झाली ठप्प

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३यवतमाळ**

कृषी विभागाकडून पेरणीसाठी बळीराजाला हातभार लावण्यासाठी दर वर्षी अनुदानावर बियाणे उपलब्ध करून देण्यात येते. त्याद्वारे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक हातभार लागतो. मात्र यंदा कृषी विभागाने ज्यांना बियाणे पाहिजे आहे त्यांनी ऑनलाइन नोंदणी करण्याची सक्ती केली आहे. मात्र ऑनलाइन नोंदणीसाठीचा सर्व्हर गेल्या दहा दिवसांपासून सातत्याने बंद पडत आहे. महाडीबीटी सर्व्हरवर यवतमाळ जिल्हा या ऑपशनवर क्लिकच होत नसल्याने शेतकरी त्रस्त झाले आहे.

शेतकऱ्यांचा आर्थिक भार कमी करण्यासाठी राज्य शासनाने कृषी विभागाच्या माध्यमातून



मोफत बियाणे वाटपाचा निर्णय घेतला. यात एका शेतकऱ्याला एक हेक्टर मर्यादेत सोयाबीनचे बियाणे वितरीत केले जाणार आहे. त्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर शेतकऱ्यांना अर्ज सादर करावे लागत आहे. प्रत्यक्षात या पोर्टलवर अर्ज सादर करण्यासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांचे अर्ज प्रक्रिये बाहेर फेकले जात आहे. सॉफ्टवेअरच्या अडचणीमुळे शेतकऱ्यांना या प्रक्रियेत अद्यापही अर्जच दाखल करता आले नाही. यातून मोठा गोंधळ उडाला आहे. मोफत बियाण्यांसाठी महाबीज कंपनीने ३ हजार २०० क्विंटल सोयाबीन बियाणे देण्याची तयारी दर्शविली आहे. तालुकास्तरावर शेतकऱ्यांसाठी बियाणे पोहोचले आहे. ३ हजार २०० शेतकऱ्यांना हे मोफत बियाणे वितरीत होणार आहे. प्रत्यक्षात या प्रक्रियेत आतापर्यंत केवळ १३२ शेतकऱ्यांचे अर्ज दाखल झाले आहे. यामुळे कृषी विभागाने ऑनलाइन अर्ज करण्याची मुदत हटविली आहे. त्यासाठी वाडी-वस्तीवरील आणि खेडेगावातील शेतकरी बियाणांसाठी ऑनलाइन अर्ज करण्यासाठी जवळच्या महा ई-सेवा केंद्रावर जात आहेत. मात्र त्या योजनेसाठी अर्ज करण्याचा सर्व्हर सातत्याने बंद पडत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे अर्ज अपलोड होत नाहीत. दहा दिवसापासून यवतमाळ जिल्ह्यावर क्लिकंच होत नसल्याने शेतकऱ्यांना बियाणांसाठी अर्ज करण्यासाठी हेलपाटे मारायची वेळ आली आहे.

प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य कृषी विभागाकडून यंदा शेतकऱ्यांना मोफत सोयाबीन पिकांचे बियाणे देण्यात येणार आहे. त्यासाठी पूर्वीसारखे लॉटरी पद्धतीने आता बियाणे मिळणार नाही तर ते बियाणे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या नियमानुसार देण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकरी पहिल्यांदा नोंदणी कशी होईल, यासाठी ते धडपडत आहेत.

तारखेचे मर्याद हटवली ऑनलाइन प्रक्रियेत किमान ३ हजार २०० शेतकऱ्यांपेक्षा अधिक अर्ज दाखल होणे अपेक्षीत होते. प्रत्यक्षात प्रारंभी १३० अर्ज आले. नंतर केवळ दोन अर्ज असे १३२ अर्ज आल्याने तारखेची मर्यादा काढण्यात आली आहे. शेतकऱ्यांना महाडीबीटी पोर्टलवर कृषी विभागाने स्पष्ठ केले आहे.

# दर्यापूरकरांच्या सामाजिक हिताचे अनोखे उदाहरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३दर्यापूर**

तालुक्यातील नायगाव येथील अनाथ, अपंग व्यक्ती व त्याची निराधार बहिणीच्या मदतीसाठी दर्यापूरकर नागरिक व अधिकाऱ्यांनी दाखविलेली माणुसकी चर्चेत आली आहे.

तालुक्यातील नायगाव येथील रमेश तुकाराम तेलगोटे हे गेल्या पंचवीस वर्षापासून गावातच राहत होते: मात्र घरातील काही अडचणीमुळे ते अकोट येथे बहिणीकडे राहायला आले. बहिणीचीही परिस्थिती अत्यंत



बिकट आहे. दोघेही बहीण-भाऊ आता जगावे तरी कसे? अशा आर्थिक विवंचनेत आहेत. अपंग भावावे बैंक खाते दर्यापूरच्या सेंट्रल बैंकेत आहे. संजय गांधी योजनेच्या मदतीवर त्यांची गुजरान सुरु असते. बँकेत पैसे काढण्यासाठी दोघेही अपंग वृध्द भाऊ-बहीण कसे तरी दर्यापुरात पोहोचले. मात्र केवायसी नसल्याने स्थानिक कर्मचाऱ्यांनी त्यांना योजनेचे पैसे देण्यास असमर्थता दर्शविली. अखेर काहीच आधार नसल्याने दोघांनीही उपाशीपोटी रस्त्यावरच रात्र काढली. भल्या पहाटे मुर्तिजापूर रोड मॉर्निंग क्लबच्या सदस्यांना हे दोघे बहीण-भाऊ दिसले. त्यापैकी विलास पाटील कोल्हे यांनी तातडीने घरी जावून या दोघांसाठी भोजनाची व्यवस्था केली. त्यानंतर हे दोघेही पुन्हा बैंकेत आले.केवायसीच नसल्यामुळे पैशाची अडचण झाली. बँकेचे मॅनेजरसुध्दा सुटीवर होते. उपाशीपोटी दोन शहरात आल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते पत्रकार गजानन देशमुख यांना मिळताच त्यांनी तातडीने बैंक तसेच मैनेजर संदीप सूर्यवंशी यांच्याशी संपर्क साधला.तोपर्यंत दुपारी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुदेश पाटील तराळयांनी या दोघांच्या जेवणाची व्यवस्था केली. सूर्यवंशी यांनीही घटनाक्रम समजून घेत माणुसकी दाखवत बँकेच्या कर्मचाऱ्यानी योग्य ते निर्देश देवून या दोन्ही बहीण-भावाची समस्या जाग्यावरच सोडविली. या निमित्ताने दर्यापूरकरांनी दाखविलेली माणुसकी पुन्हा एकदा चर्चेचा विषय बनला आहे.

# शहरी आरोग्य केंद्र पठाणचौकच्या वतीने डेंगू मलेरिया व कीटकजन्य जनजागृती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

शहरी आरोग्य केंद्र पठाण चौक अंतर्गत जमील कॉलनी चौक येथे डॉ. निगार खान, श्री वैद्यकीय अधिकारी पठाणचौक यांच्या मार्गदर्शनाखाली डेंगू मलेरिया व इतर कीटकजन्य आजारांविषयी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विशाल काळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी तसेच प्रमुख अतिथी जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. शरद जोगी होते. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ.फिरोज खान, शहर क्षयरोग अधिकारी मनपा अमरावती, डॉ. रुपेश खडसे, साथरोग अधिकारी, मनपा अमरावती, डॉ. जुनेद, जिल्हा हिवताप कार्यालय, डॉ.अस्मिता मुंद्रे, वैद्यकीय अधिकारी, डॉ. अश्विनी भिलावेकर, वैद्यकीय अधिकारी, डॉ. अस्मा रफीक खान तसेच डॉ. सौद अन्सारी, संचालक बर्थ हॉस्पिटल, डॉ. सैय्यद जाकीर, संचालक हमदम हॉस्पिटल, डॉक्टर रजिया खान व डॉ. अब्रार खान संचालक ओवीसी हॉस्पिटल, डॉ. परवेज खान, ऑरेंज सिटी हॉस्पिटल यांचे डॉ. निगार खान यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. डॉ. विशाल काळे यांनी स्थानिक नागरिकांना डेंगू व मलेरिया या विषयावर मार्गदर्शन केले तसेच डॉ.शरद जोगी यांनी मार्गदर्शन करताना डेंगू मलेरिया या नुक्कड नाटकाची प्रशंसा करून स्थानिक नागरिकांना डेंगू मलेरिया या आजाराचे निर्मूलन करायचे असेल तर आपल्याला सर्वांना आपले कुटुंब आपली



जबाबदारी याचे महत्त्व पटवून सांगितले. डॉ. रुपेश खडसे यांनी स्वच्छतेवर भर देऊन नागरिकांना डेंगू मलेरिया व चिकनगुनिया या आजारांना दूर करण्याचे आव्हान केले. तसेच उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून कर्मचाऱ्यांना तसेच नागरिकांना डेंगू मलेरिया या जनजागृती कार्यक्रमाच्या माध्यमातून आपला परिसर व आपले घर स्वच्छ ठेवण्यासाठी तसेच दूषित कंटेनर खाली करण्यावर भर दिला. गायत्री नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थिनींनी नुक्कड लघु पटनाटकातून डेंगू मलेरिया व इतर कीटकजन्य आजाराचे लक्षण, उपचार व प्रतिबंधात्मक उपाययोजना याविषयी जनजागृती केली तसेच या नाटकाचे कौतुक सुद्धा करण्यात आले. तसेच उपस्थित मान्यवरांनी जनजागृती रॅलीला हिरवी झंडी दाखवून रॅलीची सुरुवात केली. जन जन का यही हो नारा, डेंगू मलेरिया मुक्त हो एरिया हमारा. हे घोषवाक्य देऊन रॅलीची सुरुवात करण्यात आली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री हैदर अली, आरोग्य निरीक्षक यांनी केले तर या कार्यक्रमांतर्गत डेंगू मलेरिया या आजाराची निर्मूलन करण्यासाठी शपथ तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री दिपंकर बरडे आरोग्य सेवक यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री प्रशांत ढोके यांनी केले. तसेच या कार्यक्रमाला गायत्री नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थिनींनी लघुपटनाटक सादर करून या कार्यक्रमाला एक नवी दिशा दिली. डेंगू मलेरिया जनजागृती कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता शहरी आरोग्य केंद्र पठाण चौक येथील सर्व कर्मचारी तसेच आशाताई यांनी सहयोग केला. तसेच शहरी आरोग्य केंद्र व आरोग्यवर्धिनी केंद्राचे सर्व आरोग्य सेवक यांनी कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवून नागरिकांपर्यंत डेंगू मलेरिया या आजारांविषयी जनजागृती करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात आला.

# बच्चूभाऊंच्या उपोषणाशी दखल न घेतल्याने प्रहारच्या पदाधिकाऱ्यांनी केलं विष प्राशन





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ वरुड**

शेतकऱ्यांची कर्जमाफी, पिकाला हमीभाव यांसह विविध मागण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष माजी मंत्री बच्चू कडू यांच अन्नत्याग आंदोलन सुरु असताना आता अमरावती मधून आक्खी एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. बच्चू कडू यांच्या अन्नत्याग उपोषणाशी दखल न घेतल्याने प्रहारच्या कार्यकर्त्याने विषप्राशन केलं आहे. अजय भागवतराव चौधरी वय (३५ वर्ष) असं सदर कार्यकर्त्याचे नाव असून ते रा. करजगाव ता. वरुड येथील रहिवासी आहेत. त्यांना तातडीने दवाखाण्यात दाखल करण्यात आलं असून उपचार सुरु आहेत.

खरं तर महायुती सरकारने सत्तेत येण्यापूर्वी शेतकऱ्यांना जी आश्वासने दिली होती ती अद्यापही पूर्ण न केल्याने बच्चू कडू यांनी विविध १६ मागण्यांसह ८ जूनपासून मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीस्थळी बेमुदत अन्नत्याग आंदोलन केलं आहे. या आंदोलनाचा आज सहावा दिवस आहे. मात्र सरकारने अजूनही शेतकऱ्यांसाठी बच्चू कडू यांनी केलेल्या मागण्यांना आणि बच्चू कडू यांच्या आंदोलनाला गंभीर्याने घेतलेले नाही. हीच सल मनात ठेऊन प्रहार वरुड तालुका संपर्क प्रमुख अजय भागवतराव चौधरी यांनी आज विष प्राशन विष प्राशन केलं. अजय चौधरी यांचं वय वर्ष ३५ असून ते करजगावचे रहिवासी आहेत. विषप्राशन करताच त्यांना तातडीने वरुड येथील खाजगी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आलं आहे. डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

**बच्चू कडूंना रक्ताची उलटी**

दुसरीकडे बच्चू कडू यांचीही तब्बयेत आज ढासळली. आज बच्चू कडू याना अचानक रक्ताच्या उलटच्या झाल्या. त्यामुळे त्यांच्यावर प्रेम करणारी जनता चिंतेत पडली आहे. या राज्यात सध्या रोज कित्तेक शेतकरी आत्महत्या करतायत. रोज या राज्यात शेतकऱ्याची अंत्ययात्रा निघतेय. सरकारला बच्चूभाऊंची अंत्ययात्राच पाहायची आहे काय? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

**१५ जूनला राज्यभरात चक्काजाम आंदोलन**

दरम्यान, आता प्रहार संघटनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे. शेतकऱ्यांच्या भल्यासाठी आम्ही ज्या मागण्या केल्या आहेत त्या सरकारने लवकरात लवकर पूर्ण कराव्या अन्यथा १५ जूनला संपूर्ण राज्यात चक्काजाम आंदोलन करण्यात येईल असा थेट इशारा सरकारला देण्यात आला आहे. .या चक्काजाम आंदोलनात कोणतीही गाडी रस्त्यावर फिरताना दिसणार नाही. महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांनी. शेतकऱ्यांची काळजी असणाऱ्या विविध संघटनांनी आणि बच्चू कडू याना पाठिंबा देणाऱ्या पक्षांनी या आंदोलनात सहभागी व्हावं असं आवाहन प्रहार कडून करण्यात आलं आहे.

# प्रहार नेता बच्चूभाऊ कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला आ. खोडके दाम्पत्यांची भेट

## शेतकऱ्यांचा लढा सुरु राहील, परंतु प्रकृतीचा विचारकरून बच्चूभाऊंनी उपोषण मागे घेण्याबाबत सर्वपक्षीय नेत्यांचे प्रयत्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती**

शेतकऱ्यांच्या प्रश्नांना घेऊन प्रहार नेता बच्चूभाऊ कडू यांचे मोझरी येथे गेल्या पाच दिवसापासून अन्नत्याग आंदोलन सुरु आहे.आज उपोषणाचा सहावा दिवस आहे. या दरम्यान त्यांची प्रकृती खालावली असल्याने सर्वपक्षीय स्तरावर त्यांचे उपोषण सोडविण्यासाठी प्रयत्न सुरु आहे. दरम्यान आज शुक्रवार दिनांक १३ जून रोजी शिवसेनेचे मंत्री संजय राठोड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस तथा महाराष्ट्र विधान परिषद सदस्य आ.संजय खोडके व अमरावतीच्या लोकप्रतिनिधी आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी मोझरी येथे बच्चूभाऊ कडू यांच्या अन्नत्याग आंदोलन उपोषण मंडपाला भेट दिली. यावेळी आ.संजय खोडके यांनी उपोषणकर्ते बच्चू कडू व त्यांच्या समर्थकांशी चर्चा केली. राष्ट्रवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्याकडून सुद्धा बच्चू कडूंच्या प्रकृतीची विचारणा करण्यात आली असून अशा शेतकऱ्यांच्या लढवय्या नेत्याची अमरावती जिल्ह्याला खरंच गरज आहे. त्यामुळे त्यांनी शेतकरी प्रश्नी आंदोलनाचा लढा सुरूच ठेवावा, परंतु प्रकृतीचा विचार करता उपोषण मागे घ्यावे,अशी विनंती आ.संजय खोडके यांनी केली. यावेळी आपले मनोगत व्यक्त करतांना आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना घेऊन सुरु असलेल्या बच्चूभाऊंच्या लढ्यात आपण सहभागी असल्याचे सांगितले. मात्र उपोषणाचा मार्ग न अवलंबता आपण शासन दरबारी व मंत्रालय स्तरावर आंदोलन करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय देऊ. उपोषण सुटले तरी शेतकऱ्यांचे आंदोलन सुरु राहील, परंतु बच्चूभाऊंनी उपोषणाचा आग्रह सोडावा , आणि आपल्या प्रकृतीचा विचार करून आंदोलन मागे घ्यावे, असे आवाहन आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी केले.

**मंत्र्यांनी घेतली ऑनलाईन बैठक**

बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, शेतकऱ्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती, दिव्यांग, विधवा महिलांना ६ हजार रुपये मानधन तसेच वंचित घटकांचे प्रश्न या मागण्यांसाठी आंदोलन सुरू केले आहे. त्यांनी सुरू केलेल्या या आंदोलनाला राज्यभरातून अनेक नेते मंडळींनी पाठिंबा दिला आहे. अनेकांनी त्यांची भेट देखील घेतली आहे. हे आंदोलन मागे घेण्यासाठी सरकारकडून प्रयत्न देखील केले जात आहेत. मंत्री भरत गोगावले, मंत्री पंकजा मुंडे, मंत्री जयकुमार गोरे यांनी बच्चू कडू यांच्या मागण्यांसंदर्भात ऑनलाईन बैठक घेतली. परंतु, या बैठकीत ठोस आश्वासन मिळाले नसल्याने बच्चू कडू उपोषणावर ठाम आहेत.

# राजकीय मतभेद असले तरी मात्र शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर बच्चू कडू यांच्यासोबत- अ‍ॅड. यशोमती ठाकूर


**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

बच्चू भाऊ सोबत राजकीय मतभेद असले तरी शेतकऱ्याच कल्याण हाच आमच्यासाठी धर्म आहे अस मी मानत आले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर होणाऱ्या आंदोलनाला माझा पाठिंबा आहे. असे वक्तव्य माजी मंत्री अ‍ॅड यशोमती ठाकूर यांनी आज केले. प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू हे मोझरी येथे शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अन्नत्याग आंदोलन करत आहेत यावर प्रतिक्रीया देताना ड. यशोमती ठाकूर म्हणाल्या की, शेतकरी कर्जमाफी असूदे की, हमीभाव... मायबाप शेतकऱ्याच्या प्रत्येक मुद्यावर काँग्रेस पक्षाने ठाम भूमिका घेतली आहे. पक्षाच्या जाहीरनाम्यातही या मुद्यांना केंद्रस्थानी ठेवलं आहे. आमचे नेते, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुलजी गांधी यांनी सातत्याने केंद्रीय पातळीवर कर्जमाफी आणि हमीभावाचा मुद्दा लावून धरला. किंबहुना आमचं सरकार केंद्रात आणि राज्यात सत्तेत असताना शेतकऱ्यांना दिलासा देत संपूर्ण कर्जमाफीचा निर्णयही आम्ही घेतला.महाराष्ट्रात २०२४मध्ये २,६३५ तर मागच्या ६ महिन्यांत ८६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. डोक्यावरचं कर्ज, नापीकी, अवकाळी पाऊस तसेच सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांना कंटाळून शेतकऱ्यांनी आपलं जीवन संपवलं आहे. यात विदर्भ, मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्येचा आकडा अधिक आहे. राज्यातल्या महायुती सरकारने सत्तेत यायच्या आधी शेतकरी कर्जमाफीचं आश्वासन दिलं. पण सत्तेत येताच शेतकऱ्यांच्या तोंडाला पानं पुसण्याचं काम केलं अशी टिका त्यांनी यावेळी केली.भाजप आणि महायुती सरकारचे घटक राहिलेल्या बच्चू कडू यांच्या आंदोलनाला सहा दिवस उलटतायत. त्यांची साधी दखलही या निगरगट्ट सरकारने घेऊ नये? आज या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी बच्चू कडू यांनी मांडलेल्या मुद्यांना गांभीर्याने घ्यावं. तसेच त्वरित शेतकरी कर्जमाफीचा निर्णय घ्यावा अशी मागणी देखील ड. यशोमती ठाकूर यांनी यावेळी केली आहे.



# अकोल्याची ऐश्वर्या विमान अपघातामधून थोडक्यात वाचली, त्या इमारातीमधून कशी केली सुटका?





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अहमदाबाद**

गुजरातमधील अहमदाबाद येथे बुधवारी झालेल्या भीषण विमान अपघातात अकोल्याची मुलगी ऐश्वर्या तोष्णीवाल थोडक्यात वाचली. अपघाताच्या वेळी ती हॉस्टेलच्या दुसऱ्या इमारतीच्या पाचव्या मजल्यावर झोपलेली होती. अचानक मोठा आवाज झाला आणि सर्वत्र धुराचे लोट पसरले. त्या परिस्थितीतही ऐश्वर्याने धीर न सोडता धुराच्या गर्दीतून वाट काढत स्वतःचा जीव वाचवला. ऐश्वर्या गुजरात कॅन्सर रिसर्च इन्स्टिटच्यूट मेडिकल कॉलेज, अहमदाबाद येथे डीएम अँकोपॅथोलॉजीच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत आहे. ती आपल्या आजोबांचा वाढदिवस साजरा करून अकोल्याहून अहमदाबादला परतली होती.

झोपेत असताना ती अचानक मोठ्या आवाजाने जागी झाली. उठून पाहिलं तर सर्वत्र धुराच धूर होता. परिस्थितीचं गांभीर्य लक्षात येताच तिने स्वतःला कंबळात लपेटलं आणि अंधार व धुराच्या गर्दीतून मार्ग शोधत पाचव्या मजल्यावरून खाली उतरून स्वतःचा जीव वाचवला. या दरम्यान तिच्या चेहऱ्यावर, हातावर आणि पायावर भाजल्याचे निशाण आले. दरम्यान, ज्या मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलवर विमान कोसळले, तेथील २० ते २५ मुलांचा मृत्यू झाला आहे.

घाबरलेल्या अवस्थेत ऐश्वर्याने लगेच आपल्या वडिलांना अमोल तोष्णीवाल यांना फोन केला. ते त्या वेळी अकोल्याच्या दुर्गा चौकात आपल्या साड्यांच्या दुकानात होते. मुलीचा फोन येताच ते हादरून गेले आणि दुकान बंद करून तात्काळ घरी गेले. अमोल तोष्णीवाल यांनी सांगितले, टीव्हीवर बातम्या पाहताच आमचं डोकंच सुन्न झालं. पण देवाच्या कृपेने आमची मुलगी एवढ्या मोठ्या अपघातातून बचावली.

आई माधुरी तोष्णीवाल आणि आजी-आजोबा यांच्या डोळ्यांतही अश्रू तरळले. आजोबा म्हणाले, पोती आमच्या वाढदिवसासाठी आली होती, पण अशा अपघाताला तिला सामोरे जावे लागले. देवाचे शंभर वेळा आभार की ती सुखरूप आहे.

# पोतराज अन् रेडा घेऊन प्रहारची थेट तहसीलमध्ये धडक! शेवगावमध्ये अनोखे आंदोलन, बच्चू कडूंना पाठिंबा





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ शेवगाव**

प्रहार जनशक्ती पक्षाचे सर्वेसर्वा आणि अध्यक्ष बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांसह दिव्यांग आणि विधवा महिलांच्या प्रश्नांसंदर्भात आपल्या मागण्यासाठी अन्नत्याग आंदोलनाचे शस्त्र उगरले आहे. आंदोलनाबाबत सरकारकडून कोणतेही पाऊल उचलले जात नसल्याने आता प्रहारचे कार्यकर्ते राज्यभर आक्रमक होत आहे. यातच शेवगावमध्ये देखील प्रहारच्या वतीने सरकारचा निषेध आंदोलन करण्यात आले.

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी, या मागणीसाठी प्रहारचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू हे उपोषणास बसले आहेत. या आंदोलनास पाठिंबा म्हणून शेवगाव तालुक्यातील प्रहार संघटनेचे अध्यक्ष रामभाऊ शिदोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शेवगाव तहसील कार्यालयावर रेडा आणून अनोखे आंदोलन करण्यात आले. यावेळी पोतराज आणि रेडा सोबत घेत सरकारच्या निषेधार्थ घोषणाबाजी करण्यात आली. तसेच सरकारने बच्चू कडू यांच्या मागण्या तातडीने मान्य कराव्या, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

बच्चू कडूंच्या या आंदोलनाला राज्यभरातून पाठिंबा मिळत आहे. राजकीय वर्तुळातूनही बच्चू कडूंच्या मागण्यांचे समर्थन केलं जात आहे. नुकतेच राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवारांनी बच्चू कडूंना फोनवरून संपर्क साधत संवाद साधला. बच्चू कडूंची प्रकृती आता खालावली आहे.

# बकऱ्या चोरी करणारी टोळी गजाआड स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात बकऱ्या चोरी करणारी टोळी गजाआड केली आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हेशाखेने केले आहे.

दर्यापूर येथील फिर्यादी दुर्गा हिरालाल चंदनपुरी (५४) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्यांच्या बकऱ्या करत असताना तीन बकऱ्या चोरी गेल्याची तक्रार दर्यापूर पोलिसांत दिली होती. त्या गुन्ह्याचा तपास सुरु असताना गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार स्थानिक गुन्हेशाखेने आरोपी रेहान शाह रेहमान शाह (२६) रा.बी. के. नगर अकोट फाईल, अकोला यास सापळा रचून ताब्यात घेतले. त्याची अधिक चौकशी केली असता त्याने त्याचा साथीदार मोबीन शाह कासमशाह (४७) रा. बीके नगर अकोट फाईल अकोला याच्यासह बकऱ्या चोरी केल्याची कबुलीदिली. त्यानुसार पोलिसांनी मोबीन शाह काशमशहा याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली व्हॅगनार कार क्रमांक एम.एच. ३० पी. २६-२३ किंमत तीन लाख रुपये एक मोबाईल किंमत दहा हजार रुपये रोख रक्कम २२ हजार ९०० रुपये असा एकूण तीन लाख २२ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दोन्ही आरोपींनी अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात विविध ठिकाणी बकऱ्या चोरी केल्याची कबुली दिली त्यांनी आरोपींनापुढील कारवाईकरिता दर्यापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, पंकज कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हेशाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक नितीन इंगोले, सुनील महात्मे, अजमत सय्यद, सुधीर बावणे, निलेश डांगोरे, चेतन दुबे, हर्षद भुसे, सागर धापड, शिवा शिरसाठ, प्रितेश गोस्वामी, विकास अंजीकर यांच्या पथकाने केली.

# वीज सेवा अधिक लोकाभिमुख करण्यासाठी महावितरण अमरावती परिमंडळाचा पुढाकार

## लोकशाही दिनाच्या धर्तीवर आता ऊर्जामित्र दिनाचे आयोजनमहावितरण अमरावती परिमंडळाचा अभिनव उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

महावितरण अमरावती परिमंडळाने वीज ग्राहकांच्या समस्या थेट ऐकून घेण्यासाठी आणि त्याचे तात्काळ निराकरण करण्यासाठी एक लोकाभिमुख पाऊल उचलले आहे. लोकशाही दिनाच्या धर्तीवर अमरावती परिमंडळात आता ऊर्जामित्र दिन साजरा करण्यात येणार असून,या उपक्रमाच्या माध्यमातून वीज सेवा अधिक पारदर्शक, उत्तरदायी व लोकाभिमुख होईल, असा विश्वास महावितरणचे मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी व्यक्त केला आहे.

या उपक्रमाअंतर्गत, प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी महावितरणच्या सर्व उपविभागांमध्ये उपकार्यकारी अभियंता यांच्या प्रमुख उपस्थितीत ऊर्जामित्र दिन आयोजित केला जाणार आहे. या दिवशी महावितरणचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा थेट ग्राहकांशी संवाद होईल, वीज पुरवठ्याशी संबंधित ग्राहकांच्या तक्रारी, सूचना , अपेक्षा आणि अभिप्राय स्विकारल्या जाईल आणि ते निवारण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे.




अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांच्या मार्गदर्शनात आणि कार्यकारी अभियंता यांच्या देखरेखखाली होणाऱ्या ऊर्जामित्र दिनात सहभागी होण्यासाठी ग्राहकांनी आपली तक्रार आपल्या संबंधित उपविभागात त्या-त्या महिन्याच्या शेवटच्या तारीखेपर्यंत नोंदणी करावी,जेणेकरून पुढील आठ ते दहा दिवसात महावितरणला प्राप्त झालेल्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी वेळ मिळेल आणि ग्राहकांना त्याबाबत योग्य माहिती देता येईल. तसेच ऊर्जामित्र दिनाचे आयोजन त्या दिवसी सकाळी ११ ते १२ वाजेदरम्यान संबंधित उपविभागीय कार्यालयात करण्यात येणार आहे. तथापि प्राप्त सर्व तक्रारी ऐकून घेत त्या तक्रारीची दखल घेतल्या जाणार आहे.

ऊर्जामित्र दिनामुळे ग्राहक आणि महावितरण यांच्यातील संवाद अधिक खुला व विश्वासार्ह होईल, तसेच सेवा सुधारण्यास हातभार लागेल. उपक्रमाची अमंलबजावणी यशस्वी होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, ग्राहक प्रतिनिधी, वीज ग्राहक यांचा सक्रीय सहभाग अपेक्षित असून ऊर्जामित्र दिन ही एक अभिनव संकल्पना ठरणार आहे.